27 AUG 2015

आवक क्र.

ग्रामपंचायत लेखापरीक्षणाची
सुधारित कार्यपध्दती

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण २०१३/ प्र.क्र.५१/ कोषा प्रशा-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २७ऑगस्ट, २०१५

संदर्भ :- १) परिपत्रक क्रमांक - संकीर्ण १०१३/प्र.क्र.५१/कोषा प्रशा -४, दि. ०२ ऑगस्ट २०१४
२) शुध्दीपत्रक क्रमांक - संकीर्ण १०१३/प्र.क्र. ५१/कोषा प्रशा ४, दि. २७ ऑगस्ट २०१४

प्रस्तावना :

ग्रामनिधीचे लेखांकन व लेखापरीक्षण पध्दती अधिक सुलभ व प्रभावी करुन प्रलंबित लेखापरीक्षा घटकांचा जलदगतीने निपटारा करण्याच्या उद्देशाने उपरोक्त संदर्भ क. १ च्या परिपत्रकान्वये ग्रामपंचायत लेखापरीक्षणाची सुधारित कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून संदर्भ क्र. २ च्या शुध्दीपत्रकामध्ये " ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न रु. २५०००/- ते ५,००,०००/- पर्यंत असेल त्या ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण पथकामार्फत न करता एक सदस्यीय चमूकडून (एका लेखापरीक्षकाकडून) करावे " असे सूचित करण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत ग्रामपंचायतींच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाल्याने तसेच ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षण घटकांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी एक सदस्यीय चमूकडून (एका लेखापरीक्षकाकडून) लेखापरीक्षण करावयाच्या ग्रामपंचायतींच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

परिपत्रक :

ग्रामपंचायतींच्या वार्षिक उत्पन्नात वाढ झाल्याने तसेच ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षण घटकांचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी उपरोक्त संदर्भिय परिपत्रक क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :

"ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न रु. २५०००/- ते १५,००,०००/-(रुपये पंचवीस हजार ते पंधरा लाख) पर्यंत असेल अशा ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण पथकामार्फत न करता एक सदस्यीय चमूकडून (एका लेखापरीक्षकाकडून) करावे."

संदर्भिय परिपत्रक क्र. १ मधील इतर सर्व तरतूदी यापुढे ही कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ना.भा.रिंगणे)
उपसचिव, वित्त विभाग

प्रत,

सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई,
सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई/पुणे/नागपुर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
वित्त विभाग/कोषा.प्रशा.-४ (निवड नस्ती)

C:\Users\gopal.lokhande\Desktop\New folder\noting\2014\cr-51-2013 final.doc